(20)

**Enclosure to Item No. 4.88**
A.C. 25/05/2011

# UNIVERSITY OF MUMBAI

## Revised Syllabus for the T.Y.B.A. (Paper VIII)

## in

## Marathi

Paper – VIII

(with effect from the academic year 2011-2012)

## मुंबई विद्यापीठ

### तृतीय वर्ष बी० ए० (मराठी)

अभ्यासपत्रिका क्रमांक : ८ विशिष्ट लेखकाभ्यास

(I) अभ्यासपत्रिकेचे स्वरूप :

१) लेखकाचे जीवनचरित्र – लौकिक आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाची जडणघडण.

२) वाङ्मयीन कालखंड –

- –ऐतिहासिक पार्श्वभूमी.
- –समकालीन वाङ्मयीन व सांस्कृतिक वातावरण.

३) समग्र वाङ्मय – कालक्रम, ग्रंथकार यांनुसार एकूण साहित्याची मांडणी, वर्गवारी यासंबंधीची माहिती.

४) लेखकाचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व – लेखकाचा प्रतिभाधर्म, जीवनदृष्टी, कलादृष्टी आदींचे विशेष.

५) वाङ्मयाचा अभ्यास – नेमलेल्या साहित्यकृतीनुसार निर्मितीमागील प्रेरणा.

- अ) लेखकाच्या साहित्यामागील सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक स्वरूपाच्या प्रेरणा-प्रवृत्ती.
- आ) पूर्वकालीन व समकालीन लेखकाचा प्रभाव.

(II) वाङ्मयाचे स्वरूप –

- अ) प्रत्येक वाङ्मयप्रकारातील साहित्याचे स्वरूप – विशेष त्या त्या वाङ्मयप्रकाराच्या संदर्भात टाकलेली नवी भर, वाङ्मयीन गुणदोषांचे विवेचन.
- आ) समग्र साहित्याचे/वाङ्मयाचे सर्वसाधारण लेखनविशेष – आशय आणि अभिव्यक्ती या अंगांनी (वाङ्मयीन शैली इत्यादींचा विचार).

(III) लेखकाचे वाङ्मयीन कार्य आणि ऐतिहासिक स्थान.

या पत्रिकेत आधुनिक लेखक कालखंडातील लेखक नेमावा. त्याच्या चार प्रातिनिधिक साहित्यकृती नेमाव्यात. प्रश्न विवक्षित साहित्यकृतींवर केंद्रित न करता लेखकाचे समग्र साहित्य आणि वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व यांच्या स्वरूपावर केंद्रित केलेले असावेत.

एकूण पाच प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांना लिहावी लागतील.

सर्व प्रश्नांना समान गुण असतील.

विशिष्ट लेखकाभ्यास या विषयासाठी शैक्षणिक वर्ष २०११-१२, २०१२-१३, २०१३-१४ साठी श्री० जयवंत दळवी या लेखकाची निवड केली आहे. या अभ्यासपत्रिकेसाठी नेमलेली पुस्तके खालीलप्रमाणे :

१) *सारे प्रवासी घडीचे*, मॅजेस्टिक पब्लिशिंग हाऊस, (१९६४),

२) *संध्याछाया*, मॅजेस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९७९.

३) *वेचक जयवंत दळवी*, सन पब्लिकेशन, पुणे, १९८७.

४) *अंधाराच्या पारंब्या*, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, १९९५.

संदर्भ ग्रंथांची सूची नंतर पाठवण्यात येईल.

अभ्यासपत्रिका क्रमांक ६ :

'साहित्य आणि समाज' या विषयासाठी येत्या शैक्षणिक वर्षाकरिता कोणताही बदल केलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी. वर्ष २०१०-११साठीचा अभ्यासक्रम यावर्षी २०११-१२साठी तसाच ठेवण्यात आला आहे.